## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर-३२५०-अ/२०२२

**अपिलार्थी, श्री.संजय भुजबळ,**
**गाळा क्र.१२, आनंदरान लघु उद्योग संकुल,**
**एस.टी.डेपोसमोर, खोपट, ठाणे (प), जि.ठाणे**

विरुध्द

जन माहिती अधिकारी,सार्वजनिक बांधकाम विभाग,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन,
सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,
पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग,
ठाणे महानगरपालिका ठाणे, महापालिका भवन,
सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी,
पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ९.९.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ५.८.२०२२ | ---- | २३.९.२०२२ | ---- |

अपिलार्थी यांनी दि.१४.११.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "आजच्या तारखेपर्यंत कोणतेही उत्तर दिले नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ९.९.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत.(कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तथापि, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुदर्शन मोरे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (मुख्यालय), ठाणे महानगरपालिका, ठाणे हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(एस.एम.सी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांना दिलेल्या वर्क ऑर्डर REF/TMC/C.G.W.O./१७ मधील कामाबाबत कत्रांटदार यांनी सादर केलेल्या प्रपत्रांची सत्यप्रत मिळण्याबाबत) "*

*"(१) उपरोक्त विषयांकित टेंडरचे कंत्राटदार यांनी सुरू केलेल्या साईटवर काम करणा-या मजूर कंत्राटदाराची कामगार आयुक्त कार्यालयात नोंदणी केलेल्या प्रपत्रांची सत्यप्रत मिळण्याबाबत. (२) उपरोक्त विषयांकित टेंडरचे मजूर कंत्राटदार यांनी सुरू केलेल्या साईटवर काम करणा-या मजूर कामगाराची आयुक्त कार्यालयात नोंदणी केलेल्या प्रपत्रांची सत्यप्रत मिळण्याबाबत. (३) उपरोक्त विषयांकित टेंडरे चे मजूर कंत्राटदार यांनी सुरू केलेल्या साईटवर काम करणा-या मजूर कामगाराची जवळच्या पोलीस स्थानकात माहिती दिली असल्यास प्रपत्रांची सत्यप्रत. (४) कॉंक्रीटीकरणाचे मिक्चर प्लांटमधून निघाल्यानंतर २ तासाच्या आत सदर साईटवर अनलोड झालेले बाबत सदर ठिकाणी सब इंजिनिअर यांच्या अहवालाच्या रिपोर्टची सत्यप्रत मिळणेबाबत. (५) कॉंक्रीटीकरण करणारे मजूर हे सदर कामाचे प्रशिक्षित असल्याचे प्रमाणपत्र मिळणेबाबत.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांचा मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात आढळून येत नाही. यासाठी त्यांनी आयोगाकडे वेळेची मागणी केली. सबब, त्यांची वेळेची मागणी मान्य करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि. २८.१०.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्‍द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ९ सप्टेंबर, २०२५

**अपिल क्रमांक : के.आर-३२५०-अ/२०२२**
**अपिलार्थी, श्री.संजय भुजबळ,**
**सुनावणी दिनांक २८.१०.२०२५ (In continuation of order dt.९.९.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी दि.९.९.२०२५ रोजीच्या सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा अर्ज त्यांच्या कार्यालयात आढळून येत नसल्याने आयोगास पुढील तारखेची विनंती केली होती. तथापि, त्यांचे विनंतीवरून आज सुनावणी घेण्यात आली. तथापि, आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. यावरून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना अद्याप माहिती दिली नाही असे दिसून येते. सबब, अपिलार्थी यांना माहिती मिळण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुदर्शन मोरे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (मुख्यलय) ठाणे महानगरपालिका, ठाणे यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुदर्शन मोरे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (मुख्यलय) ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या मागणीप्रमाणे संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (मुख्यालय), ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या मागणीप्रमाणे संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.**
२. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुदर्शन मोरे, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (मुख्यलय) ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ५.८.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.४.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**
३. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.४.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

**(शेखर चन्‍द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २८ ऑक्टोबर, २०२५

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. सुदर्शन मोरे, उप अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग (मुख्यलय) ठाणे महानगरपालिका, ठाणे
महापालिका भवन, सरसेनानी अरुणकुमार वैद्य मार्ग, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे जि.ठाणे ४०० ६०२.